Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 8 | April– 2017

दक्षिण सोलापूर तालुक्यातील फळबागांच इतिहास

प्रा. डॉ. व्हनबिंदगे व्ही. पी.
अर्थशास्त्र विभाग, छ. शिवाजी नाईट कॉलेज, सोलापूर.

प्रास्ताविक :-

सोलापूर जिल्हयाची सिंचनक्षमता वाढत असल्याने आणि शेतकऱ्यांचा ओढा नगदी पिकाकडे वाढल्याने ऊस मोठया प्रमाणात होत आहे. याचा परिणाम म्हणून सोलापूर जिल्ह्यातील फळबाग लागवडी खालील क्षेत्रात घट होत आहे. सन २००९-१० या वर्षात ८ हजार हेक्टरवर करण्यात आलेल्या फळबाग लागवडीचे क्षेत्र कमी होऊन सन २०१०-११ यावर्षी ३ हजार ८१० हेक्टरवर स्थिरावली आहे. सोलापूर जिल्ह्यास वरदायी ठरलेल्या उजनी धरणात पाण्याचा मुबलक साठा निर्माण झाला त्यामुळे कालव्याव्दारे शेतीस पाणी उपलब्ध होऊ लागले. परिणामी शेतकऱ्यांनी नगदी पिकाकडे धाव घेतली. दोन वर्षापूर्वी १० लाख हेक्टर क्षेत्रावर ऊसाची लगवड करण्यात आली होती. ती या वर्षी (२०११-१२) १२ लाख हेक्टरपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. साखर कारखान्यांनी चांगला दर दिल्याचा परिणाम ही ऊसाचे क्षेत्र वाढण्याकडे झाला तर फळबागावर पडणाऱ्या रोगामुळे तसेच दराची अनिश्चितता असल्याने सांगोला, माढ, माळशिरस या भागातील अनेक शेतकऱ्यांनी बोर, डाळींब, सिताफळाच्या बागा काढून ऊसाची लागवड केली आहे. फळबागाच्या तुलनेत शेतकऱ्यांसाठी ऊस हे कमी कष्टाचे पीक आहे. त्याचा ही परिणाम फळबागाचे क्षेत्र घटण्यात होत आहे. शासनाने या सर्व परिस्थितीचा दखल घेत राज्यात फळबाग लागवड योजनेव्दारे शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी १०० टक्के अनुदान जाहीर केले असले तरी, मागील दोन वर्षापासून सोलापूर जिल्ह्यात फळबागाचे क्षेत्र घटत असल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्रातील अनेक दुष्काळी जिल्ह्यामध्ये सोलापूर जिल्हा तीव्र दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. सोलापूर जिल्ह्यात पाऊस अनियमित व अनिश्चित स्वरुपात पडतो. सरासरी ६०० मि.मी. पेक्षा कमी होऊ पडणाऱ्या पाऊस जिल्ह्यातच दक्षिण सोलापूर हा तीव्र असा दुष्काळी तालुका आहे. म्हणून दक्षिण सोलापूर तालुका हा सोलापूर जिल्ह्यातील मागासलेला तालुका म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जेव्हा भाषावार प्रांत रचना झाली तेव्हा दक्षिण सोलापूर तालुक्यातील वाद निर्माण झाला होता. तो वाद म्हणजे हा तालुका महाराष्ट्रात रहावा की, कर्नाटकात रहावा. यासाठी एक समिती नेमली गेली. या महान समितीने अशी शिफारस केली की, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुका कन्नड भाषिक असल्याने कर्नाटकाला द्यावा व बेळगांव जिल्ह्यातील काही भाग महाराष्ट्रास घ्यावा तेंव्हा पासून आजपर्यंत शासनाचा या तालुक्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन दुर्लक्षित आहे. स्वातंत्र्यानंतर इतर तालुक्याच्या विकासाठी शासनाने जे विविध उपक्रम राबविले त्याच्या तुलनेने दक्षिण सोलापूर तालुक्यात काहीच ठोस कार्यक्रम नाही.

राज्यामध्ये गेल्या पाच वर्षात अवर्षणामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची कसोटी लागीली. विदर्भातील शेतकऱ्यांना आत्महत्येसाठी टोकाची भूमिका स्विकारावी लागली. अशी परिस्थिती का उद्‌भवली याच्या मुळाशी जाऊन शोध घेतल्यास असे लक्षात येत की, अवर्षणप्रवण भागातील शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबुन राहू नये व जुनी परंपरागत पिके घेण्याऐवजी रोखीचे व विशेषतः फळ-फळावरासारखे पिके घेतल्यास कमी पाण्यात अधिकाधिक पैसे देऊ शकणारी पिके घेण्यास यावेत. तसचे शेतीच्या जोडीला कृषि आधारीत उद्योगधंदे म्हणून दुग्ध व्यवसाय, पशुपालन, कुक्कुट पालन, शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे याचा अवलंब शेतऱ्यांनी केल्यास अवर्षण परिस्थितीला तोंड देण्यास तो सक्षम होतो. पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः सांगली व सातारा जिल्ह्यातील मागील चार-पाच वर्षात तीव्र दुष्काळ असूनही काही प्रमाणात शेतीला प्रक्रिया उद्योगाची जोड असल्याने त्या भागातील शेतकरी हाताश झाला नही.

दक्षिण सोलापूर तालुका हा अवर्षण प्रवण भागत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी प्रचलित पिक पध्दतीने बदल करुन फळबागासारख्या कमी पाणी लागणाऱ्या पिकाची कास धरली तर कमी पाण्यामध्ये अधिक तर कमी पाण्यामध्ये अधिक उत्पादन मिळवून तो अर्थिक दृष्ट्या स्वंयपूर्ण होऊ शकतो. म्हणून शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण व्हावी, फळबागाचे महत्व, त्याचा प्रचार प्रसार व्हावा, शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा ही या लेखामागची भमिका आहे. तरुण सुशिक्षित बेकार वर्ग इतर ठिकाणी भटकत राहण्यापेक्षा आधुनिक फळबाग, भाजीपाला, इ. पिके शेती मधून घेऊ लागल्यास आपण स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणु शकतो.

सोलापूर जिल्ह्याचे हवामान फळ पिकासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे फळांचा दर्जा व उत्पादन चागले निघु शकते. या मधुन अधिअधिक रोजगार निर्माण होऊ शकते. दक्षिण सोलापूर तालुक्यात जी पडीक जमिन आहे ती जमीन लागवडीखाली आणल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होऊन वाढत्या लोकसंख्येची गरज भागविण्यात मदत होणार आहे. त्यासाठी फळबाग लागवडीतून सांगोला तालुका प्रयत्नाच्या बळावर नैसर्गिक परिस्थिती आपल्या पेक्षा प्रतिकुल असताना विकसित झाला आहे. हे ज्वलंत उदाहरण आपल्यासमोर आहे.

सोलापूर जिल्ह्यातील फळबाग लागवडीखालील क्षेत्र सन २०१०-११

अ.क्र.	पिकांची नावे	लागवडीखालील क्षेत्र (हेक्टरी)
	आंबा	९३५३
	डाळींब	३३०१८
	केळी	२५००
	सिताफळ	१४२६
	आवळा	७४१
	चिंच	२२२५
	पेरु	१९९१
	द्राक्षे	१२०००
	लिंबु	७००७
	चिक्कु	४२२९
	पपई	१५००
	बोर	१८५०१
	एकूण फळबाग पिके	**९४४९१**

भाजीपाला पिके

अ.क्र.	पिकांची नावे	लागवडीखालील क्षेत्र (हेक्टरी)
	वांगी	१०००
	टोमॅटो	२०००
	भेंडी	५००
	कांदा	१३०००
	मिर्ची	२०००
	एकूण फळबाग पिके	**१८५००**

फळबाग लागवडीचे फायदे :-

१) अनुकूल नैसर्गिक घटक :- फळबागासाठी मध्यम, मुरमाड व पाण्याचा निचरा होणारी जमीन लागते. स्वच्छ सूर्यप्रकाश, धुकेविरहित हवामान, मर्यादित पाण्याची उपलब्धता, आर्द्रतारहित कोरडे हवामान इ. अनुकूल नैसर्गिक घटकांची आवश्यकता असते ते आपल्या भागात आहे.

२) रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन :- ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी केवळ पारंपारिक शेतीवर अवलंबून राहून चालत नाही. त्या व्यतिरिक्त अनेक रोजगार निर्माण करुन देण्याची आवश्यकता आहे. उदा. फळबाग, कृषि, उद्योग, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन वराहपालन, रेश्मी किडयांचे संगोपन, सामाजिक वनीकरण इ. गोष्टींचा अभाव या तालुक्यात आढळतो. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर या दोन्ही वर्गाची परिस्थिती नाजूक आहे. तसेच सुशिक्षित बेकार तरुणांचा वर्ग मोठ्या प्रमाणात पडून आहे. रोजगाराचे प्रमुख साधन असे तालुक्यात कोणतेही नाही. फक्त एक साखर कारखाना सध्या चालू आहे.

३) कमी पाण्यात येणारी पिके :- पाणी म्हणजे जीवन. जे पाण्याचा विचार करतात ते जीवनाचा विचार करतात. फळपीकांना ठिबक सिंचनाव्दारे, नळ पध्दती व्दारे पाणी देता येईल. या दोन्ही पध्दतीने पाण्याची बचत होऊन कमी पाण्यात जास्तीतजास्त पिके घेता येईल. या तालुक्यातील भिमा व सिना या दोन नद्या वाहत असून या नद्यांना देखील उन्हाळयात काही वेळा पाणी नसते.

४) नवीन संकरित जातीची बी-बीयाणे/रोपे :- पारंपारिक पालेभाज्या व फळबाग यांची लागवड करित राहिल्याने दर एकरी मिळणारे उत्पन्न कमी असते. वाढती लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन केवळ शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून न पाहता व्यापारी दृष्टीकोनातून शेतीकडे पाहण्याची गरज आहे. फळबाग पालेभाज्या यामध्ये कृषि विद्यापीठे, कृषि शास्त्रज्ञ यांनी नवीन संकरित जातीची बी-बीयाणे/रोपे याचा शोध लावल्याने मोठ्या प्रमाणात सध्या वापर होत आहे. त्यामुळे दर एकरी उत्पन्न वाढून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.

५) आधुनिक तंत्रज्ञानाचा वार :- फळबाग लागवड पध्दतीमध्ये कलमे/रोपे व तंत्रज्ञान याचा वापर करणे गरजेचे आहे. यासाठी शासन फळबासाठी १०० टक्के अनुदान देत आहे. आधुनिक तंत्राचा वापर केल्याने श्रम, पाणी व पैसा याची बचत होते. त्याच बरोबर पिकांची गुणवत्ता वाढते.

६) आंतरपिके घेता येतात :- फळबागापासून उत्पन्न येण्यासाठी दोन व तीन वर्षाची वाट पहावी लागते. परंतु शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने तेवढा वेळ तग धरण्यांची त्यांची मनाची तयारी नसते. त्यासाठी शेतकऱ्यांनी फळबागात त्यांच्या सोयीनुसार अंतर पिके घ्यावे. दैनंदिन खर्चासाठी पैसे हवे असतील तर भाजीपाला सारखे अंतर पिके घ्यावी.

७) अधिक उत्पन्न मिळते :- द्राक्षे, केळी, ऊस, पपई ही अधिक पैसे मिळवून देणारी पिके आहे. आंबा, बोर, डाळींब, नारळ, चिंच, लिंबु, चिक्कु, आवळा इ. फळपिके रोखीची पिके म्हणून गणले जातात. इतर सर्व नगदी पिकापेक्षा फळ लागवडीपासून अधिक उत्पन्न मिळते. कारण फळबाग या मुदत ठेवीसारखे असतात. जशी सात वर्षासाठी मुदत ठेव ठेवल्यास मुदत संपल्यावर दामदुप्पट रक्कम मिळते. तशी फळबागात फळबागेची दोन ते तीन वर्षे व्यस्थित निगाह राखल्यास जवळ बारा ते पंधरा वर्षे कायमस्वरुपी रोखीची पिके म्हणून पैसा मिळवून देते. अज्ञानपणाने अधिक खर्च वाढवून विस्तृत शेती करण्यापेक्षा कमी क्षेत्रात, कमी पाण्यात, अधिक खताची मात्रा देवून सखोल शेतीपध्दतीचा वार करुन फळबाग लागवड केल्यास निश्चितचे अधिक अर्थप्राप्ति होते.

८) शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा :- फळपिकांच्या लागवडीने, पालेभाज्या, फळभाज्या याच्या वापराने व इतर जोड धंद्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होते. त्यामुळे त्यांना दुध, फळ-फळावळे यांचे सवेन करु लागतो. त्यामुळे आहारातून त्यांना २४०० कॅलरी उष्मांक मिळू लागतो. त्यामुळे तो निरोगी व कार्यक्षम बनतो/राहतो.

सन २००३-०४ या वर्षातील सोलापूर जिल्ह्यातील फळबाग लागवडी खालील क्षेत्र व सन २०१०-२०११ या वर्षातील फळबाग लागवडीखलील क्षेत्र याची तुलना :-

अ.क्र.	**तालुका**	**सन २००३-०४**	**सन २०१०-११**
	उत्तर सोलापूर	२१७१	५०
	दक्षिण सोलापूर	२८६९	१०५
	अक्कलकोट	४९६८	११९
	मोहोळ	७०१७	१५९
	मंगळवेढा	५८३७	१६९
	पंढरपूर	८७३५	३१९
	माळशिरस	४६७८	उपलब्ध नाही
	सांगोला	१३२५१	१५७५
	करमाळा	३५७२	३८२
	माढा	८२८५	२७८
	बार्शी	६२७१	३०६
	एकूण	**६८९५६**	**३८१०**

वरील तक्त्यावरुन आपणास असे दिसून येत कि, जास्तीत जास्त फळबाग लागवड क्षेत्रात सांगोला तालुका प्रथम क्रमांकावर आहे. त्यानंतर दुसरा क्रमांक पंढरपूर तालुक्याचा लागतो. सर्वात कमी फळबाग लागवड दक्षिण सोलापूर तालुक्याचा आहे. सांगोला तालुक्यातील जमिनी व पाऊस पाणी प्रकिूल असताना देखील तेथील शेतकरी स्वतःच्या नेतृत्वाच्या जोरावर व लोकांचा विकास करुन घेण्याची प्रबळ मानसिक इच्छाशक्तीच्या जोरावर तालुक्याचा विकास करुन घेतला. व फळे परदेशाला निर्यात करुन चार पैस अधिक मिळविले व देशाला प्रक्रिया चलनही मिळवून दिले.

भवितव्य :-

लोकांच्या मनामध्ये फळपिकांच्या लागवडीच्या संदर्भात प्रबळ इच्छा निर्माण झाली पाहिजे. शेतकऱ्यांनी फळपिकांच्या पूर्व मशागती पासून लागवडीपर्यंत पुन्हा फळवाढी पासून ते बाजारपेठेत मालाची विक्री होवून हाजी पैसे मिळेपर्यंत अद्यावत ज्ञान मिळविले पाहिजे. तेंव्हाच शेतकऱ्यांमधील आत्मविश्वास निर्माण होईल. पाण्याची जास्त भिती बाळगण्याचे कारण नाही. कारण द. सोलापूर तालुक्यात पाझर तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे नाला बिंल्डिंगचे कामे मोठया प्रमाणात झालेली आहे. तसेच शिरवळ येथे मोठे तलाव (धुबधुबी) झाल्याने शेतीला पाण्याचे प्रश्न काही अंशी मिटलेला आहे. द. सोलापूर तालुक्यातील जमिन सुपिक व काळी-कसदार आहे. शासन सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. खरी गरज आहे ती लोकांच्या प्रबळ इच्छा-शक्तीची, निसर्गाकडून मिळणाऱ्या पाण्याची योग्य व काटकसरीने इस्त्राईलसारखे वापर करण्याचे, पाण्याची महत्व ओळखले पाहिजे व इतरांना समजावून सांगितले पाहिजे पाणी हे

अनमोल संपत्ती आहे त्याचा जपून वापर करा. त्यातूनच आपण स्वावलंबी व स्वभिमानी जीवन जूग शकाल. शेतकरी हा राजा आहे. हे ध्यानात असू द्या

संदर्भ :-

१) अवर्षण प्रवण क्षेत्रातील जल व्यवस्थापन.
२) महाराष्ट्र शासन कृषि विभाग-पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम.
३) जि. कृषि विभागातील फळपिक निहाय लागवड क्षेत्र-सोलापूर जिल्हा.
४) ता. कृषि विभाग द. सोलापूर विभागाकडून माहिती.
५) सोलापूर जिल्हा परिषद वेबसाईट.